॥ श्री ॥

# महाराष्ट्र मंडळ, लंडन

३०६ डॉलिस हिल लेन, क्रिकलवूड, लंडन

(स्थापना: १९३२)

माझा मराठाचि बोलु कौतुके
परि अमृतातेंही पैजा जिंके



## त्रैमासिक वार्तापत्र अंक -२

## (एप्रिल – जून २०१०)




** आपल्या आगामी कार्यक्रमात वरील नामवंत व्यक्तींना पाहण्याची सुवर्णसंधी **

## *नवीन कार्यकारी मंडळ – २०१०*

| | | | |
|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | श्री. अविनाश धोपटकर | avinash.dhopatkar@sky.com | 0208 859 4299 |
| उपाध्यक्ष | सौ विजया काणेगावकर | vijaya.kanegaonkar@yahoo.co.uk | 01303 265 033 |
| कार्यवाह | श्री. केदार लेले | lele_kedar@yahoo.com | 0208 427 3445 |
| कोषाध्यक्ष | डॉ प्रिया कुलकर्णी | dr.kpriya_2610@yahoo.co.in | 0754 522 2562 |
| जनसंपर्क | श्री संदीप पाध्ये | spadhye@gmail.com | 0785 217 5460 |
| कार्यक्रम संयोजक | सौ. शुभदा परांजपे | komalrishabh@yahoo.co.uk | 0772 556 9149 |
| सहाय्यक | श्री संतोष अंबिके | ambikesantosh@yahoo.com | 0208 332 1404 |
| | श्री. सुशील रापतवार | meetsushil@gmail.com | 0796 108 2639 |
| | श्री. घन:श्याम पाटील | ghanshyam.patil@gmail.com | 077 2526 3964 |
| | श्री. अजित सरवडीकर | ajitls@yahoo.com | 0772 641 0795 |
| | श्री. गौरव जाधव | gauravjadhav@gmail.com | 0783 4763 489 |
| | सौ. अंजली धोपटकर | avinash.dhopatkar@sky.com | 0208 859 4299 |

कार्यक्रमासंबंधी माहिती व तिकिटासाठी आपण कार्यकारी पैकी कोणाशीही संपर्क साधू शकता ..

## *कार्यकारी समितीची उद्दिष्टे ( २ वर्षाची )*

अ. **संपर्क** - मराठीत वार्तापत्र, विश्व-महाजालाचा (WWW) उपयोग.

ब. **संवाद** - गप्पा गोष्टी, मराठीच्या प्रसारासाठी प्रयास, इतर मंडळांबरोबर सहकार्य, सभासदत्व वाढवण्यावर भर, मराठी उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजक सभासदांचे ’स्नेहसंवाद-वर्तूळ’.

क. **सहवास** - आगामी वर्षातील कार्यक्रमांचा ढोबळ तपशील, सणवारांचे रितसर आयोजन, अरूण-तरूण व मुले यांना मराठीची आवड कशी निर्माण होईल यावर खास लक्ष केंद्रीत करणे, सभासदांच्या मुलांच्या गुणवत्तेचे कौतूक.

ड. **विधायक प्रकल्प** - १. वाचनालय, २. छोटेसे वस्तू-संग्राहालय, ३. मंडळाच्या संकेतस्थळामधे (website) मधे सुधारणा व नवीन सोयी.

## *अध्यक्षांचे मनोगत*

पुढील २ वर्षे मंडळाची धुरा सांभाळण्यासाठी आमची निवड केल्याबद्दल माझ्या व कार्यकारी समितीच्या वतीने मी सर्व सभासदांचे मन:पूर्वक आभार मानतो. आपल्या सर्वांच्या परिचयाच्या काही व्यक्तींबरोबरच नव्या जोमाने मंडळात येऊन विविध क्षेत्रांतील आपल्या अनुभवाचा उपयोग करण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तींचाही या समितीत समावेश केलेला आहे. आपल्या सहकार्याने आम्ही विविध प्रकारचे मनोरंजक, बोधप्रद, वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर करू. कार्यक्रम आवडल्यावर तुम्ही दिलेली दाद जशी आनंदाने स्वीकारू त्याचप्रमाणे सुधारणासाठी केलेल्या सूचनांचाही तत्परतेने विचार करू. या वार्तापत्रात दिलेले ४ कार्यक्रम आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहून यशस्वी कराल अशी माझी खात्री आहे.

अविनाश धोपटकर.

## *महाराष्ट्र मंडळ तुमच्या दारी*

महाराष्ट्र मंडळ लंडन ची जेव्हा स्थापना झाली तेव्हा बराच मराठी समाज हा उत्तर लंडन मध्ये राहत होता. हळू हळू आपला समाज लंडन च्या सर्व भागांमध्ये पसरत गेला . आज आपण लंडनच्या कुठल्याहि भागा मध्ये गेलो तर मराठी शब्द कानावर पडतात .अश्या या सर्व मराठी बांधवांची ओळख करून घेण्यासाठी , त्यांना महाराष्ट्र मंडळ लंडन मध्ये समाविष्ट करून घेण्या साठी, आणि एक फार मोठा मराठी समाज लंडन मधेच नव्हे तर पूर्ण UK मध्ये तयार करण्या साठी महाराष्ट्र मंडळ लंडन road shows आयोजित करत आहे . तुमच्या भागा मध्ये असा road show व्हावा असे वाटत असल्यास तुम्ही आम्हाला संपर्क करू शकता ...

email द्वारे संदीप पाध्ये spadhye@gmail.com यांच्याशी संपर्क साधा

## *आगामी कार्यक्रम*

दरवर्षी दणक्यात साजरा होणारा , लहान- थोर सगळ्यांना भावणारा , खास आपल्यासाठी

# * आनंद मेळा *




शनिवार दि. १५ मे २०१०

दुपारी ३.३० वा.

स्थळ: मंडळाचे सभागृह

इथे अनेक चविष्ट पाककृतींचा आस्वाद घ्या. जोडीला गमतीचे खेळ, पुस्तके, गप्पा, असे अनेक प्रकार एकाच ठिकाणी सापडतील. आपल्या मित्र-परिवारा सहित या.. धमाल करुया ...

हौशी व उद्यमशील बाल / कुमारांनी, सभासदांनी, लघु उद्योजकांनी , व्यावसायिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा ...

आपला स्टॉल राखून ठेवण्यासाठी

संपर्क :

सौ. विजया काणेगावकर

०१३०३ २६५ ०३३

अनेक वर्षांच्या आपल्या प्रतीक्षेला फळ आले आहे !

BJ Medical Art Centre प्रस्तुत लोकप्रिय  संगीत नाटक

## *  कट्यार काळजात घुसली  *




शनिवार दि. १२ जून २०१०

दु: ३.३० वा

स्थळ: मंडळाचे सभागृह

तिकिट दर: £ १२/-  , £ ८/-

लेखक पुरुषोत्तम दारव्हेकरांनी दाखवलेला संगीतातील घराणेशाहीचा तीव्र संघर्ष , पं. जितेंद्र अभिषेकींनी  दिलेले प्रभावी संगीत, आणि पं. वसंतराव देशपांडे यांनी अजरामर केलेली खाँसाहेबांची भूमिका  संगीत नाटकाच्या उज्वल परंपरेची आठवण करून देतात. ज्या नाटकाने मराठी मनात स्वतंत्र स्थान मिळविले आहे, ते नाटक नवीन कलाकार संचात बघायची ही नामी संधी आहे !


| | | |
|---|---|---|
| सौ विजया काणेगावकर | vijaya.kanegaonkar@yahoo.co.uk | 01303 265 033 |
| डॉ प्रिया कुलकर्णी | dr.kpriya_2610@yahoo.co.in | 0754 522 2562 |

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या Marseilles येथील जगप्रसिद्ध उडीच्या शताब्दी निमित्त

लंडन मध्ये आयोजित

# * अमृताचा घनु *



## रविवार दि. ४ जुलै २०१०

## सायं: ४ वा .

स्थळ: **Sattavis Patidar Centre,**

Forty Avenue, Wembley Park, Greater London, Middlesex. HA9 9PE.

**पं. हृदयनाथ मंगेशकर** आणि **पं. शंकर अभ्यंकर** यांची स्वातंत्र्यवीर सावरकरांना श्रद्धांजली म्हणून हा कार्यक्रम या शतकातील अतिशय महत्वाचा आहे. तर अशा ह्या क्षणांना साक्षीदार होण्याची लंडनवासियांना ही सुवर्ण संधी आहे . आपल्याला या ऐतिहासिक सोहळयामध्ये सहभागी व्हायचे असेल तर आपली नोंदणी ताबडतोकरा. नोंद होताच तुम्हाला अधिक तपशील आणि कार्यक्रमाची अधिक माहिती देण्यात येईल.

अनुक्रमे ४-४ रांगाचे तिकिट : ~~£२५/-~~, £२०/-, £१५/-

त्यानंतर १० रांगांचे तिकिट: £१०/-

विशेष तिकिट: £५०/-

विशेष प्रायोजक : £५००/-

*तिकीटे अगदी मोजकी आहेत तेव्हा निराशा टाळण्यासाठी आजच आपली नोंदणी करावी*

संपर्क: amrutachaghanu2010@googlemail.com

आनंद पटवर्धन: anandpatw@gmail.com (०२०८२२०७४४५)

सौ. विजया काणेगावकर (०१३०३ २६५ ०३३ )

# * प्रवचन *

पं शंकर अभ्यंकर यांचे वीर सावरकरांवर प्रवचन

शुक्रवार दि २ जुलै व दि. ३ जुलै




सायं: ६ ते ८

स्थळ: मंडळाचे सभागृह

(२ दिवसीय शृंखलेचे संयुक्त तिकिट केवळ £१०)

| | | |
|---|---|---|
| सौ विजया काणेगावकर | vijaya.kanegaonkar@yahoo.co.uk | 01303 265 033 |
| डॉ प्रिया कुलकर्णी | dr.kpriya_2610@yahoo.co.in | 0754 522 2562 |

## *आभार*

गेल्या ३ महिन्यातील देणगी चे तपशील , व देणगीदारांचा विशेष उल्लेख इथे करत आहोत. मंडळाच्या वतीने आपले मन:पूर्वक आभार.

| | |
|---|---|
| १. डॉ. गोविंद काणेगावकर | £५,००० |
| २. डॉ. (सौ) विजया काणेगावकर | £५,००० |
| ३. डॉ. सुहास नामजोशी | £२५० |
| ४. श्री. राजीव सुभेदार | £१५० |
| ५. श्री. सुशील रापतवार | £५१ |

आपण सर्वजण वेळोवेळी  मंडळाच्या कार्याला सभासद होऊन, व कार्यक्रमाला हजेरी लावून मदत करता.  आम्हालाही  हुरूप येतो . आम्ही आपले आभारी आहोत.
गणेशोत्सव व इमारत निधी साठी मिळालेल्या देणग्यांचे तपशील Audit झाल्यानंतर वार्तापत्रात प्रसिद्ध केले जातील.

# *मंडळाची वाटचाल*

- सभासद अर्ज अंकाच्या शेवटी जोडला आहे. नूतनीकरण करण्यासाठी/ नवे सभासद होण्यासाठी हा form कृपया भरून पाठवावा. आपण सभासद असाल तर कृपया आपल्या मित्र-मैत्रिणींना सभासद होण्यासाठी प्रवृत्त करा.
- मंडळाच्या सभासदांची संख्या आता ७५० आहे. सभासदत्वाचा वार्षिक आकार भरण्यासाठी standing orderची सोय केल्यास आपले सभासदत्व विनासायास अखंड राहील.
- पुढील वार्तापत्राची PDF आपल्याला ई-मेल द्वारा पाठविण्याचा मानस आहे. आपला ई-मेल पत्ता नोंदवायचा असल्यास किंवा पोस्टाने प्रत हवी असल्यास कार्यकारी समितीला तसे कळवावे.
- मंडळाच्या आवाराची दुरुस्ती, व सुरक्षा फाटक बसवण्याचे काम लवकरच सुरू करण्यात येईल.
- विश्वस्त स्व्यंपाकघरातील smoke alarm बाबत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याबाबत अधिक माहिती पुढील वार्तापत्रात.
- वार्षिक सर्वसाधारण सभेचा तपशील परिशिष्ट म्हणून या वार्तापत्रास जोडला आहे.

# *श्रद्धांजली*

* **सुधाकर जोशी**

महाराष्ट्र मंडळाचे माजी **विश्वस्त** व कार्यकारी समितीचे माजी अध्यक्ष, श्री. सुधाकर जोशी यांचे दि. ७ एप्रिल २०१० रोजी दु:खद निधन झाले.

मंडळाची वास्तु वास्तवात आणण्यापासून तिचे यथोचित नूतनीकरण करण्यात श्री. सुधाकर जोशी यांचा वाटा खूप मोठा आहे. स्व्त:च्या हिमतीवर शैक्षणिक यशाबरोबरच व्यवसायातही धनसंपत्तीने समृद्ध होऊन त्यांनी अनेक संस्थांना देणग्या देण्यातही पुढाकार घेतला. धनिष्ट असूनही सर्वांशी समतेने घनिष्ट राहणे , कायम हास्यवदन , मदत करण्यास तत्पर, कोणत्याही कार्यक्रमाचा मित्र समूहासह आनंद लुटण्याची आस, अशा अनेक आठवणींची साखळी आता त्यांची खरी यादगार आहे.

"जातस्यहि धृवो मृत्यु ध्रुवं जन्ममृतस्यच " या कालचक्राच्या गतीनुसार सुधाकर आता आपल्यातून गेले आहेत. ते या जगात नाही हे पटणे कठीण आहे.

सुधाकरांच्या पश्चात त्यांची पत्नी , तीन मुली, दोन जावई, व चार नातवंडे यांच्या दु:खात महाराष्ट्र मंडळ सहभागी आहे. परिवारावर ओढवलेल्या दु:खाचा दाह कमी होऊन , ते सहन करण्याची शक्ती त्यांना लाभो ही परमेश्वराजवळ प्रार्थना.

*     **Keshav Pai**

We are sad to report that Mr Keshav Pai passed away a few weeks ago. He came to the UK in 1956 and worked as a quality control officer with Fords in their plant at Slough for a long time. He was always cheerful and willing to help others. He was very fond of sports such as cricket and football. He was a member of MML and regularly attended our programmes. He always made it a point to come to the Mandal during Ganeshotsav. His life was prolonged because his wife had donated one of her kidneys to him. We join his wife Tara and son Ashok in their grief at this time.

*     **Shreemati Savtribai (MAI) Gulhane.**

One of the welcoming places for young Mahrashtrians in the fifties was a house owned by Mai Gulhane—3 Middleton Road.

Sadly,Mai Gulhane passed away on Thursday 22nd April.

Mai, who hailed from Amaravati, came to London in 1949 with her two children. After working as a seamstress, cook & a factory hand she managed to acquire the Middleton Road house where many of the first generation Marathi youngsters took shelter. Some of the earliest Mandal activists – Chitnis, Chavan etc were residents there and worked for the Mandal from that house and some wonderful memories of early Marathi group are associated with the area.

Mai was born in June 1911 and would have been 99 this year. Her family and friends were looking forward to celebrating her 100th b'day but it was not to be. She is survived by a son ( Keshav- Past President of the Mandal) and a daughter, 6 Grandchildren and 12 Great Grand children one of whom – a girl – was born on the day she passed away.Another link with the past has vanished--- May her soul rest in peace!

# ललित विभाग

*माझे मनोगत*

शुभदा परांजपे

कार्याचे आरंभी
गणेशाचा मान
पहिले कवन
त्यास वाहू ।

संपर्क, संवाद,
सहवास घडो
मराठीचा जडो
छंद मना ।

रमवाया तुम्हां
नवे उपक्रम
असा नित्यक्रम
चालू द्यावा ।

काय सांगता हो
भाषा येत नाही
शिकू लवलाही
येता गोडी ।

“ब्रोशर" नव्हे हे
म्हणू वार्तापत्र
बोलवा सर्वत्र
होवो त्याचा ।

गुणिजन तुम्ही
असता पाठीशी
होईल सरशी
मराठीची ।

वाट पाहतो, या
या सहकुटंब
आनंदे तुडुंब
मन होवो ।

घेतला हो विडा
कार्यरत सदा
भाग्याची शुभदा
परांजपे ।

"देवद्वार" छंदाची ओळख मिसळपाव या संकेत स्थळावर श्री. धोंडोपंतांनी करून दिली. तेव्हापासून त्याची अवीट गोडी खुणावत होती... पण आज मनोगत याच छंदात अवतरले अन छंदबद्ध कविता रचण्याची गंमत कळली !

उत्सुक वाचकांसाठी देवद्वार छंदाची थोडक्यात माहिती इथे देते आहे.

पहिल्या ३ चरणात प्रत्येकी ६ अक्षरे व ४ थ्या चरणात ४ अक्षरे असतात. २ ऱ्या व ३ ऱ्या चरणाचे यमक असते. या छंदाची अनेक उदाहरणे आपल्याला परिचयाची असतील , आठवतील .

नाही नाही मज
आणिक सोयरा
न करी अव्हेरा
पांडुरंगा ...

किंवा

रात्रंदिन आम्हा
युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग
आणि मन ... इत्यादि...

## *मंत्रमुग्ध*

- दि. २० मार्च रोजी गौरी स्वकुळ (कथक) आणि सोनल शिवकुमार (गायन) यांनी अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केला. गौरीच्या अप्रतिम नृत्यशैलीने सर्व प्रेक्षकांना खिळवून ठेवले तर सोनल यांच्या गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. या अप्रतिम कार्यक्रमाला सर्वांनी अगदी मनापासून दाद दिली. कार्यक्रमानंतर गौरीने आयोजित केलेल्या कथक कार्यशाळेला लहान मुलींचाच नव्हे तर मोठ्यांचा पण छान प्रतिसाद मिळाला.



- दि. ३ एप्रिल रोजी विजय व जितेंद्र रघुवीर यांच्या जादूच्या प्रयोगांचा कार्यक्रम आयोजित केला होता. ईस्टरची सुट्टी असल्याने मुलांना काहीतरी नवीन बघायला मिळेल अशा खात्रीने पालक त्यांना घेऊन आले होते.

  Dice through silk, Something for nothing, Lord of the Rings, Bengal Cane trick अशा छोट्या प्रयोगा पासून सुरु करून Handcuff escape, Telepathy, Guillotine , Air leviation असे एका पाठोपाठ एक चित्तथरारक प्रयोग जादुगार रघुवीर पिता-पुत्रांनी सादर केले. जमलेले, २ वर्षाच्या नातवंडांपासून ते साठी उलटलेल्या आजी-आजोबांपर्यंत सगळे मंत्रमुग्ध झाले. २ तास कसे भुर्रकन उडून गेले. मध्यंतरात वडे - सामोशांचा समाचार घेऊन सर्व ताजेतवाने झाले. बालचमू जादू शिकण्यास कार्यशाळेत सामिल झाला. Giant cards, vanishing ring , stiff rope हे प्रयोग कसे करायचे ते जादुगारांनी मुलांना शिकवले. त्यासाठी लागणारी सामुग्री उपलब्ध करून दिली.

  सुंदर मनोरंजक कार्यक्रम सादर केल्याबद्दल आणि त्यात सगळ्यांना सहभागी करून घेतल्याबद्दल अध्यक्ष, श्री धोपटकरांनी जादुगार रघुवीर यांचे आभार मानले. नवनवे प्रयोग करून आपल्या मित्रांना चाट पाडू असा विचार करीत छोटी छोटी मुले घरी परतली.



# जाहिरात विभाग

## वार्तापत्रामधे जाहिराती

मंडळाच्या ७५० सभासद **कुटुंबीयापर्यंत** आपला संदेश हमखास पोहोचेल अशी योजना आजच करा!
योग्य दरात आपल्या व्यवसायाची , उपक्रमाची, सेवेची जाहिरात या त्रैमासिकात करता येईल !!!
(हे ई-वार्तापत्र आपल्या संस्थळावरही उपलब्ध होईल)

संपर्क: सौ. विजया काणेगावकर (०१३०३ २६५ ०३३ )
सौ. शुभदा परांजपे komalrishabh@yahoo.co.uk

---

## कार्यालय भाड्याने उपलब्ध आहे !

सभा , समारंभासाठी मंडळाचे स्वच्छ, प्रकाशमान, व प्रशस्त कार्यालय (१५० क्षमतेचे), उत्तम मंच, नेटके छोटेसे स्वयंपाकघर, पार्किंगची सहित  रास्त दराने उपलब्ध आहे

चौकशी व बुकिंग साठी संपर्क:
मिलिंद देशमुख ०२०८४५० ५००९ (बुध सकाळ सोडून)
गोविंद काणेगावकर ०१३०३२६५०३३ (सायं)

## Hall for Hire

Maharashtra Mandal Hall is available for hire for social functions,meetings, and professional gatherings.

This  beautifully decorated large hall (seats 150), with a spacious stage, a kitchen,  off street parking & disabled parking bays can be hired at reasonable charges.

**Contact for rates and bookings**

Milind Deshmukh 0208 450 5009 (Excluding Wed AM)

Govind Kanegaonkar 01303 265 033 (Evenings)

# आवाहन : ललित लेखन

त्रैमासिक वार्तापत्राच्या ललित विभागात प्रसिद्धीसाठी लिखाण **सभासदांनी** पाठवावे अशी विनंती. पुढील वार्तापत्रात त्याचा समावेश करता येईल. आपले अनुभव, प्रवास वर्णन, स्फुट , कथा, कविता, बाल विभागाचे साहित्य असे प्रकार मराठी वाचक पसंत करतील असा अंदाज आहे.
लिखाण **मराठीत** असावे व **स्वत:चेच** असावे ही अपेक्षा आहे.
ललित व अन्य साहित्याच्या संकलनाची व वार्तापत्रात प्रकाशित करण्याची जबाबदारी संपादक-समितीची आहे. या विषयीचा सर्वस्वी आणि अंतिम निर्णय संपादक-समिती राखून ठेवीत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

# मंडळाचे ग्रंथालय

दर शनिवारी ग्रंथालय सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत ग्रंथालय **सभासदांसाठी** खुले असेल. अपवाद केवळ मंडळात कार्यक्रम असलेले शनिवार. अशा दिवशी ही वेळ सभासदांच्या सोयीकरिता कार्यक्रमाच्या आधी २ तास राहील. श्री आदित्य काशीकर ग्रंथालयाचे कामकाज पाहतात.
वेळेची खात्री करण्यास ०२०८ ४५० ५००९ वर संपर्क साधावा.
*लंडन मधील सर्वात मोठा मराठी ग्रंथसंग्रह अशी ह्याची ख्याती आहे, तेव्हा सर्व सभासदांनी त्याचा आवर्जून लाभ घ्यावा ही विनंती..*

# MML Library

Library is open for members every Saturday between 10am and 2pm. Aditya Kashikar is available to issue books, CD's , DVD's to members.
To confirm that Library is open , please ring 0208450 5009. Library will also be open for members a short while before starting other MML events ,if possible.
*(Occasionally, it is transformed into a dressing room for artists)*

Please take advantage of the library, as it is the largest collection of Marathi Books in London Boroughs!

# परिशिष्ट

## *AGM 27$^{th}$ March 2010 (Minutes)*

Chairperson- Yamini Sathe

Secretary- Avinash Dhopatkar

Chairperson of Board of Trustees – Viju Kale

Finance Trustee- Ratan Lele

All the members stood in silence for a minute to pay their respects in the memory of Jatin Dighe, Madhu Abhyankar and Madhukar Amrute who passed away recently.

The applications for Executive Committee (EC) and Nomination Committee (NC), should have been invited by the EC and not by the Trustees as printed in the last brochure. Mrs Sathe apologised for the mistake on behalf of EC and trustees.

**Approval of the minutes of the last AGM**

As a long time had passed since the publication of the minutes of the last AGM, it was requested that these should be read out. Mr Dhopatkar duly read out these minutes.

It was asked whether the amount of Rs.15 lakhs promised by the Chief Minister Vilasrao Deshmukh to MML was received and what efforts were made to collect this amount.

Mrs Sathe confirmed that this amount was not yet received. Some members felt that it was the responsibility of the Finance Trustee (FT) to try to collect this amount. Mr Subhedar (previous FT) confirmed that he was in contact with the relevant parties by phone, e mail and letters to get the money from India. Different members had conflicting views on how this was handled but most members felt that we should not trust the promises of the politicians in future and should not invite them for such functions. It was also felt that criticising each other will not serve any purpose and that members should work together to achieve the objectives of MML.

A question was asked about the MML library (which stocks CDs and DVDs as well

as books) and how many people are using it.

Mr Kashikar, who looks after the library confirmed that around 10 to 15 people regularly make use of it. It was suggested that if the library is kept open before MML programmes, members who do not live close to MML can also use it and borrow books when they come to attend the programmes. Mr Kashikar also confirmed that a list of books will be available on our website. A tribute was paid to Mr Shyam Thakur who helps in the library in spite of indifferent health.

A question was asked about the use of the extra room we now have in the basement and Mrs Sathe explained that it is intended to be used for child-minding.

EC Report, Board of Trustees Report and Accounts

As these reports were printed in the recent brochure, they were taken as read.

It was asked by a member ' What did the MML gain by the establishment of MML Trading Co?'

The FT explained that the trading company was established in order to be able to claim VAT on MML expenditure especially on building repairs and that an amount of around £10,000 was already claimed in this way. We will be able to claim VAT in future too. Mr Subhedar (previous FT) said that the new company is now called MMUK and is also a recognised charity. He said that the title deeds of the buildings should now be transferred from the names of individual trustees to MMUK.

It was suggested that all life members of MML should automatically become members of MMUK. However, one member felt that we should see the constitution of MMUK before implementing any suggestions.

It was decided that it should be printed in the *next brochure*.

One member complained about the loss incurred in the programmes organised by MML as reflected in accounts of last year and enquired whether budget was prepared for each programme.

It was pointed out by the FT that MML is not a profit-making organisation and that it exists to achieve its objectives (which includes providing cultural programmes for the

members) as laid down in the constitution. Others pointed out that even if you make budgets the number of people who will attend is not predictable and a loss cannot be ruled out. Besides, taking into account overall income and expenses MML is in a financially healthy position. It was suggested that we could create a 'Programme Fund' like our 'Building Fund'. It was suggested that more programmes should be organised during daytime rather than evening and that an annual ticket may be issued to members covering all programmes in a year. It was suggested that in order to reduce the cost, food may be cooked in the MML kitchen. The problems created by smoking alarm and insurance cover in this context were mentioned. The trustee dealing with building matters (Mr Kanegaonkar) stated that he will report within two months whether and how we can solve these problems.

Mrs Sathe said that the new EC would consider all these suggestions.

Mr Mukundrao Nawathe brought a new banner for MML from India as the old one had faded. Mrs Sathe thanked him for that.

The accounts (as shown in the last brochure) and minutes of the last AGM were approved buy the General Body (GB)

Election of the Nomination Committee (NC)

The following 7 names were suggested for the Nomination Committee - Mr Sharad Dandawate, Dr Meena Bhide, Mrs Vijaya Bhanap, Mr Shriram Kale, Dr Sham Kolvekar, Mr Ashish Prabhudesai and Dr Shraddha Parchure.

In this context some members pointed out the importance of the NC members as, according to the constitution, they have to scout for the trustee candidates discussing with them their roles and responsibilities and ensure that they have the relevant skills and experience to be trustees. Some members felt that as long as one has a minimum educational standard he/she should be considered for NC membership.

As the election of the members of the NC is to be effected by postal ballot the procedure

will be explained in the next brochure.

### Resolution 1

It was proposed that European Marathi Sammelan (EMS) 2012 should be held in London. Mr Anil Nene gave information about previous EMS held at various places in Europe and assured all help to make it a success in London. It was suggested by some members that it should be held on the outskirts of London (to save the cost of accommodation) and that it should not clash with the Olympics in London. A mention was made of the likelihood of Vishva Sahitya Sammelan to be held in 2011 to be invited to London. However, this was not discussed in detail, as the resolution did not refer to it. It was mentioned that the Trustees should put a limit of maximum loss MML should suffer for such special programmes, say £10,000 each.

The Resolution was passed by the GB

### Resolution 2

Briefly, this resolution proposed that the money collected by way of donations to Ganesh Festival should be used for all expenses of the festival including remuneration for the artistes who present programmes. It was felt that some artistes were not properly remunerated in the past. It was also mentioned that it was a practice that several artistes gave their performance as offering towards Lord Ganesh and did not expect normal remuneration. As there are several programmes during this festival lasting 10/11 days, the cost of paying normal remuneration to all artistes would be substantial. It was proposed that the Festival Committee should have the powers to take decisions in this matter taking into account all these factors..

The Resolution was passed by GB

### Resolution 3

The proposer of this Resolution suggested that there was discord between EC and BoT and among members of the BoT. The president of EC confirmed that BoT had tried to intervene in the functions of the EC.

One member expressed the view that if some trustees are creating obstacles in the

work of others rather than trying to foster the objectives of MML they should resign.

Another member felt that as no specific issues of discord were mentioned, the GB cannot take any decision and that the trustees would have to sort out the issues among themselves. It was felt by others that for an aggrieved trustee there is no other recourse but to come to the GB.

The Chairperson of BoT Mrs Kale assured that there will be harmony among the trustees in the future. She also confirmed that Dr G Kanegaonkar will be the Chairman of the BoT for a year from now on.

**The Resolution could not be passed in its present format.**

**Election of the President and the Executive Committee**

The Returning Officer Mrs Anjali Tarabadkar stated that there was only one application received for the post of the President in response to the notice in the last brochure. That application was therefore unanimously upheld and Mr Avinash Dhopatkar was declared as duly elected president. He was asked to present the members of his EC to the General Body.

Mr Dhopatkar thanked the General Body for bestowing the honour of presidentship. He thanked all the members of the previous EC for presenting good and varied programmes over the last two years although there were only a handful of people in the EC. He also thanked all those who helped in organising and conducting the programmes as well as those who attended the programmes. He urged all the members to support MML programmes by attending them in even greater numbers in future. He mentioned that if, in addition to the activities organised by MML, the members wish the EC to do something else, they should make their suggestions to the EC and the trustees. Last year some members suggested that we should organise a get together and lunch for the senior citizens once a week in the Mandal. This suggestion is now implemented.

Mr Dhopatkar assured that the new EC will try to organise quality programmes in the next two years. He also assured that the EC will strive to achieve the objectives of MML as expressed in the constitution. In order to achieve this, in addition to some members of the previous EC who have shown their commitment to MML and worked hard in two last two years, new members who will bring new ideas and capabilities are invited to join the EC. A list of the following members was proposed for election to the EC. Mrs V

Kanegaonkar, Mr S Rapatwar, Mr S Padhye, Mr G Patil, Mr Kedar Lele, Mr S Ambike, Mrs S Paranjape, Ms Priya Kulkarni, Mrs S Ambike, Mrs A Dhopatkar, Mr A Sarvadikar, Mr G Jadhav and Dr S Kolvekar.

One member stated that it should be verified whether all those proposed for inclusion in the EC are members of MML. Another member mentioned that they should be members for at least 12 weeks before AGM. Mr Dhopatkar assured that he will follow the procedure as laid down in the constitution.

### Any Other Business

A member mentioned that he had contacted Zee TV for making Marathi programmes and serials available to us in UK and that EC should liaise with them.

Some members expressed that MML should try to eliminate negativity, stop criticising each other and try to introduce new ideas to ensure that all the programmes are well attended by the members.

*******

## *Nomination committee – Postal ballot*

The procedure for election of Nomination committee will be communicated separately.

## *MMUK – Memorandum of Association*

As agreed in AGM, we intended to print the Memorandum in this newsletter. Considering the size of the document, the EC has now decided to provide this memorandum on the website. If members are keen to get a printed copy, please email a request to the President .